आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्तविभाग
राष्ट्रीय बातमीपत्र
सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

दिनांकः15.12.2024 वारः रविवार

---

ठळक बातम्या

1)हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला महाराष्ट्र मंत्रीमंडळाचा आज नागपूरमध्ये विस्तार,

2)भारत लोकशाहीची जननी तर देशाचं संविधान एकतेचा आधार असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन.

3)एक राष्ट्र एक निवडणूक विधेयक केंद्रीय कायदा मंत्री उद्या लोकसभेत सादर करणार

4)ओमान इथं सुरू असलेल्या महिलांच्या कनिष्ठ आशिया करंडक हॉकी स्पर्धेत अंतिम सामन्यात भारताची चीन बरोबर लढत

आणि

5) बॉर्डर-गावस्कर कसोटी मालिकेच्या तिसऱ्या सामन्यात सुरुवातीच्या पडझडीनंतर ऑस्ट्रेलियाची आश्वासक सुरुवात .

राज्यमंत्रीमंडळ

राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार आज संध्याकाळी नागपूर इथल्या राजभवनात होणार आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मंत्रीमंडळ विस्तार होत आहे. भाजप नेत्यांनी केंद्रीय नेतृत्वाकडे मंत्र्यांची यादी पाठवली असून तिथून मंजुरी मिळाल्यानंतरच संबंधित आमदारांना सूचना देण्यात येणार आहे. नागपूरमध्ये 33 वर्षांनंतर मंत्रीमंडळ विस्तार होणार आहे.

राज्यघटनाअमृतमहोत्सव

देशानं राज्यघटना स्वीकार केल्यापासूनचा प्रवास असाधारण असल्याचं प्रतिपादन काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत घटना स्वीकार केल्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित दोन दिवसीय चर्चेला उत्तर देताना केलं. आपल्या देशाची प्राचीन लोकशाही विश्वाला दीर्घकाळ प्रेरणा देत राहील. भारत केवळ मोठे लोकशाही राष्ट्र नसून ते लोकशाहीची जननी असल्याचे गौरवोद्गार पंतप्रधानांनी काढले. 2047 पर्यंत विकसित देशाच्या लक्ष्यपूर्तीत, एकता हे मूल्य महत्त्वाचं असून, आपलं संविधान एकतेचा आधार असल्याचंही ते यावेळी म्हणाले. संविधानाने महिलांना मतदान, आरक्षणासारखे अधिकार मिळवून दिल्याची आठवण त्यांनी

करून दिली. त्यांनी देशाच्या विविधतेचा भंग कऱणारे कृत्य केल्याबद्दल भूतकाळातल्या काँग्रेस सरकारवर टीका केली. नेहरू- गांधी घराण्याने संविधानावर वार केला, तसंच, भूतकाळातील सरकारचे निर्णय अधोरेखित करत प्रत्येक पातळीवर संविधानाला आव्हान दिल्याचंही ते म्हणाले. तर आम्ही गेल्या 10 वर्षात संविधान बळकट केल. भाजपा सरकारने सुरू केलेल्या विविध योजना, जम्मू काश्मीरमध्ये लागू करण्यात आलेलं कलम 370 रद्द करणं, एक देश एक वस्तु सेवा कर अशा सरकारने उचललेल्या पावलांविषयी सविस्तर माहिती दिली. एक राष्ट्र एक शिधापत्रिका,आयुष्मान कार्ड,एक राष्ट्र एक ग्रिड या मुळं देशातील जनतेच्या आयुष्यात सुलभता आल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे. दरम्यान भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी संविधानाला 75 वर्ष पूर्ण झाल्याबद्दल संसदेमध्ये झालेल्या चर्चे दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या व्यक्तव्याला दुजोरा दिला असून पंतप्रधानांचं हे वक्तव्य कॉंग्रेस आणि इतर विरोधी पक्षांकडून संविधान आणि इतर विषयांवर पसरवल्या जात असलेल्या संभ्रमाला दूर करून देशाला स्पष्ट दिशा देणारं असल्याचं म्हटलं आहे. संविधान दिवस साजरा करण्याची सुरुवात आणि संविधानकर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आदर्श यावर चालणं हे या गोष्टीचा प्रमाण आहे की भाजप संविधानाचा खरा रक्षक आहे, असं नड्डा यांनी आपल्या समाज माध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे.

लोकसभा एक निवडणूक

सरकारनं एक राष्ट्र एक निवडणूक या विषयी दोन विधेयकं लोकसभेत उद्या सादर करण्यात येणार आहेत. कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल संविधान विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदा विधेयकदेखील उद्या संसदेत सादर करतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रीमंडळानं गुरुवारी लोकसभा आणि राज्यसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याविषयीच्या विधेयकाला मंजूरी दिली होती. प्रस्तावित संविधान संशोधन विधेयकामधे लोकसभा आणि राज्यसभा निवडणुका एकाच दिवशी करण्यासंबंधी तरतूद असेल. माजी राष्ट्रपति रामनाथ कोविन्द यांच्या उच्च स्तरीय समितीनं लोकसभा आणि राज्यसभेसाठी देशात एक राष्ट्र एक निवडणूक हा प्रस्ताव मांडला होता.

पंत. मुख्य सचिव

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दिल्लीमध्ये मुख्य सचिवांच्या चौथ्या संमेलनाला संबोधित करणार आहेत. तीनं दिवस होणाऱ्या या संमेलनाला पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी सुरुवात झाली आहे. राज्यांच्या मदतीनं साधलेल्या विकासचं मूल्यमापन करणं आणि कार्यान्वित करणं, हा या संमेलनामगचा उद्देश आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या एकत्रित भागीदारीला सशक्त करणं तसंच सहकारी संघराज्यवाद, जलद आर्थिक वृद्धी,आणि विकासामधे योग्य ताळमेळ हे या

संमेलनातील चर्चेचे विषय आहेत. या संमेलनात सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव,वरिष्ठ अधिकारी आणि तज्ञ सहभागी झाले आहेत.

कृषी कर्ज मर्यादा

भारतीय रिझर्व्ह बँकेनं तारणमुक्त कृषी कर्जाच्या मर्यादेत चाळीस हजार रुपयांची वाढ केली आहे. नव्या वर्षापासून तारणमुक्त कृषी कर्जाची मर्यादा एक लाख साठ हजारांहून वाढून दोन लाख रुपये करण्याची घोषणा केली आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात, वाढती महागाई आणि शेती लागवडीचा वाढता खर्चाचा विचार करून हा निर्णय घेण्यात आल्याचं नमूद केलं आहे. शेतकऱ्यांना कृषी कामांसाठी तसंच कृषी विकासासाठी पुरेशी संसाधने उपलब्ध व्हावी यासाठी अतिरिक्त तारणाविना जास्त आर्थिक मदत पुरवण्याचा यामागे हेतू असल्याचंही निवेदनात म्हटलं आहे. या निर्णयामुळे पत सुलभता वाढणार असून त्याचा लाभ लहान शेतकऱ्यांना होणार आहे. यामुळे किसान क्रेडिट कार्डची उचल वाढेल जेणेकरून शेतकऱ्यांना शेतीशी निगडीत कामात गुंतवणूक करता येईल आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा होण्यास हातभार लागणार आहे.

जका हल्ला

जम्मू-काश्मीरमधील शिव खोरी, रानसू येथून कटरा येथे यात्रेकरूंना घेऊन जाणाऱ्या बसवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याशी संबंधित प्रकरणातील आरोपी हकमखान याच्याविरुद्ध राष्ट्रीय तपास संस्थेने काल आरोपपत्र दाखल केले. गेल्या 9 जून  रोजी हा हल्ला झाला होता. या हल्ल्यात आठ यात्रेकरू तसेच बस चालक ठार झाला होता तर 41 यात्रेकरू गंभीर जखमी झाले होते. गोळीबारामुळे बस चालकाच्या डोक्याला गोळी लागल्याने त्याचे नियंत्रण सुटले. त्यानंतर बस एका खोल दरीत कोसळल्याने अनेकांना आपले प्राण गमवावे लागले.

श्रीलंका राष्ट्रपती

श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसानायके आज भारताच्या 3 दिवसांच्या दौऱ्यावर येणार आहेत. श्रीलंकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे. दिसानायके यांच्या भेटीमुळे दोन्ही देशांमधील परस्पर सहकार्य अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे. या भेटीदरम्यान दिसानायके राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेणार असून द्विपक्षीय मुद्द्यांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशीही ते चर्चा करणार आहेत. गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि दोन्ही राष्ट्रांमधील व्यावसायिक संबंध वाढवण्यासाठी दिसानायके दिल्लीतील एका कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. त्याचबरोबर ते भारत आणि श्रीलंका यांच्यातील सामायिक सांस्कृतिक घटकांच्या अनुषंगाने बोधगया इथं भेट देणार आहेत.

पुस्तक महोत्सव

समाजाला सृजनशील आणि विचारवंत ठेवण्यासाठी वाचन संस्कृती जिवंत ठेवणं ही काळाची गरज असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुणे पुस्तक महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना केलं. राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीनं पुण्यातल्या फर्गसन महाविद्यालयाच्या मैदानावर पुणे पुस्तक महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी बोलताना, अशा प्रकारचा पुस्तक महोत्सव पुण्यापुरताच मर्यादित न ठेवता संपूर्ण महाराष्ट्रात त्याचं आयोजन केले पाहिजे, याकरीता शासन आपल्या पाठीशी नेहमी उभे राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

महिला कनिष्ठ हॉकी

ओमान इथं सुरू असलेल्या महिलांच्या कनिष्ठ आशिया करंडक हॉकी स्पर्धेत, भारतीय संघानं अंतिम फेरीत धडक मारली आहे. काल जपानच्या संघाचा **3-1** असा पराभव करत संघानं अंतिम फेरी गाठली. भारताच्या दीपिकानं **2** तर मुमताजनं **1** गोल केला. उपांत्य फेरीचा दुसरा सामना चीन आणि दक्षिण कोरिया दरम्यान होणार असून, त्यातील विजेत्या संघाशी अंतिम फेरीत भारतीय संघाचा सामना होणार आहे. शेवटचे वृत्त हाती आले तेव्हा चीननं दक्षिण कोरियाला **4-1** नं हरवून अंतिम फेरीत आपलं स्थान निश्चित केलं आहे.

क्रिकेट

ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या बॉर्डर -गावस्कर करंडक कसोटी मालिकेतल्या तिसऱ्या सामन्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी उपहारापर्यन्त ऑस्ट्रेलियाच्या **3** बाद **104** अशी आश्वासक सुरुवात केली आहे. आज सकाळी खेळ सुरू झाल्यानंतर यजमानांचे तीन गडी **75** धावांवर बाद झाले होते. सामन्याचा पहिला दिवस तेरा षटके वगळता पावसामुळे वाया गेला. पाच सामन्यांच्या या मालिकेत दोन्ही संघ १-१ असे बरोबरीत आहेत.

हवामान

उत्तर,मध्य आणि पश्चिम महाराष्ट्रात येत्या **2** ते **3** दिवसांत थंडीची लाट येणार असल्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. आजही मध्य प्रदेशातील काही भागात जोरदार थंडीची लाट कायम राहो शकते असंही सांगितलं. पंजाब,हरियाणा,चंदीगढ,उत्तर प्रदेश,छत्तीसगढ,पश्चिम बंगाल आणि ओडिशाच्या काही भागांमध्ये पुढील **2** दिवस थंडीचा वाढता प्रभाव राहील असं हवामान विभागानं सांगितलं आहे. तसच जम्मू काश्मीर,लददाख,गिलगीट बाल्टिस्तान आणि मुजफ्फराबाद मध्ये देखील थंडी वाढण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं,नमस्कार**